अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. ०९/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ २२३२ दि. २६/०६/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/०९/२०१९

श्री रमेश विष्णू खामकर
२६४, नारायण पेठ, दै. प्रभात जवळ,
पुणे ३०.

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी
तथा प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

श्री रमेश विष्णू खामकर रा. २६४, नारायण पेठ, दै. प्रभात जवळ, पुणे ३० (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. २६.०४.२०१९ रोजी अर्ज करून "मा. आयुक्त, पुणे मनपा यांचेकडे (भाग १ व भाग २) अनेक वर्षे एकाच खात्यात कार्यरत असणारे सेवकांची अन्य खात्यात बदली करणे बाबत केलेल्या अर्जाबाबत एकूण ६ मुद्द्या बाबत" माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/१०७९ दि. १६.०५.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २६.०४.२०१९ | २६.०४.२०१९ | २५.०५.२०१९ | १६.०५.२०१९ | - |

अपिलार्थी यांनी “आजपर्यत कोणतीही माहिती न दिल्याने मी हे प्रथम अपील करीत आहे.” असे नमूद करून अपील क्र. ०९/२०१९ चा अपील अर्ज दि. ०४.०६.२०१९ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०४.०६.२०१९ | ०४.०६.२०१९ | १५.०६.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि.२०.०६.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री रमेश विष्णू खामकर** रा. २६४, नारायण पेठ, दै. प्रभात जवळ, पुणे ३० हे उपस्थित होते. श्री चेतन कबाडे **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा हे उपस्थित होते.

**विवेचन**

अपिलार्थी **श्री रमेश विष्णू खामकर** रा. २६४, नारायण पेठ, दै. प्रभात जवळ, पुणे ३० यांनी यांना माहिती मिळाली नाही असे प्रतिपादन केले तर श्री चेतन कबाडे **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/१०७९ दि. १६.०५.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे असे प्रतिपादन केले.

## आदेश

**श्री रमेश विष्णू खामकर** रा. २६४, नारायण पेठ, दै. प्रभात जवळ, पुणे ३० यांनी माहिती मिळालेली नाही असे नमूद केलेले आहे. तथापि सदरची माहिती बाबत **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी अपिलार्थी यांना दिलेले पत्र जा. क्र. जमाअ/आस्था/१०७९ दि. १६.०५.२०१९ अन्वये मिळालेले दिसते. सबब अपील अमान्य करण्यात येत आहे. प्रथम अपील क्र. ०९/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका